




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९३ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । १७/०४/२०२६ । पाने - ६







## संगमनेर चावडीतील कारभाराचा ‘भोंगळ’ चेहरा उघड

### खासगी लोकांच्या ताब्यात दप्तर, आ. अमोल खताळांची धडक दखल, पण सुधारणा कधी?



आमदार अमोल खताळ यांनी बुधवारी तलाठी कार्यालयात अचानक भेट देत तेथील एजंटांचा कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला. त्यानंतर तेथील एका कर्मचाऱ्याने आमदार खताळांबाबत चुकीची भाषा वापरल्याने संतप्त झालेल्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आज संबंधित कर्मचाऱ्यांचा टेबल काढून घेत त्याला घरी पाठवले.

युवावार्ता (प्रतिनिधी)

शहरातील चावडी येथील तलाठी कार्यालयातील गंभीर गैरप्रकारांमुळे महसूल विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. शासनाच्या कार्यालयात अधिकृत कर्मचाऱ्यांऐवजी खासगी व्यक्ती बसून नागरिकांची कामे करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, यामुळे नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या आणि अपुरी कर्मचारी संख्या यामुळे तलाठी कार्यालयातील कामकाज कोलमडले आहे. एकाच तलाठ्याकडे तीन-तीन गावांचा कारभार सोपवण्यात आल्याने तो बहुतांश वेळा मिटिंगच्या नावाखाली बाहेर असतो. परिणामी कार्यालयात खासगी एजंटांचेच राज्य निर्माण झाले आहे. नागरिकांना आपली कामे वेळेत करून घेण्यासाठी या एजंटांकडे जास्त पैसे मोजावे लागत असल्याची तक्रार सर्वत्र ऐकायला मिळते.

या पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ यांनी बुधवारी अचानक चावडी येथील तलाठी कार्यालयाला भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. खासगी व्यक्तींच्या उपस्थितीवर त्यांनी संताप व्यक्त करत संबंधितांना जाब विचारला. त्यांच्या या धडक कारवाईमुळे महसूल विभागातील अनियमितता आणि कोतवालांच्या मनमानीचा प्रकारही समोर आला आहे.

माहितीनुसार, चावडीवरील तलाठी कार्यालयात नियुक्त कोतवाल इतरत्र काम करत असून, दुसऱ्या गावातील कोतवाल येथे काम पाहत आहे. ही नेमणूक अधिकृत आहे की मनमानी, याबाबत स्पष्टता नसल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, येथे दोन नव्हे तर तीन खासगी व्यक्ती काम करत असून, त्यातील एकाने आपल्या नातलगालाही येथे बसवले असल्याची माहिती पुढे आली आहे. अंतर्गत वादातूनच हा प्रकार उघडकीस आल्याचे बोलले जाते.

गेल्या अनेक वर्षांपासून चावडीतील हीच परिस्थिती कायम असून, महसूल विभागाला स्वतंत्र व सुसज्ज तलाठी कार्यालय उभारता आलेले नाही. जुन्या आणि वादग्रस्त जागेत सुरू असलेल्या या कार्यालयाच्या मालकीबाबतही संभ्रम आहे. त्यामुळे ही जागा दर्ग्याची आहे असे सांगून काही जण जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतात, अशीही चर्चा आहे. (पान ३)

**नागरिकांची अपेक्षा**

कार्यालयात अधिकृत कर्मचारी हवे, कामे पारदर्शक पद्धतीने आणि वेळेत व्हावीत, आणि एजंटगिरीचा कायमचा अंत व्हावा. आता पाहावे लागेल की, आ. खताळ यांच्या कारवाईनंतर प्रशासन खरोखर जागे होऊन सुधारणा करते की हा मुद्दा फक्त चर्चेपुरताच मर्यादित राहतो.

## संगमनेर हादरले! चुलत्याकडून पुतणीचा विनयभंग भावजयीवर जीवघेणा हल्ला

### आरोपीला पोलिस कोठडी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळिमा फासणारी आणि संतापजनक अशी धक्कादायक घटना समोर आली आहे. साडेतीन वर्षांच्या निष्पाप चिमुरडीचा विनयभंग करून तिच्या आईवरच जीवघेणा हल्ला करणाऱ्या नराधम चुलत्याला पोलिसांनी अटक केली आहे. संतोष शंकर राऊत (वय ३४, रा. घुलेवाडी, संगमनेर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आपल्या अवघ्या ३ वर्षे ५ महिन्यांच्या मुलीला आंघोळ घालून बेडवर ठेवून स्वतः आंघोळीला गेली होती. याच संधीचा फायदा घेत आरोपी संतोष राऊत याने निष्पाप बालिकेच्या गुप्तांगाला स्पर्श करून तिचा विनयभंग केला.

महिला बाथरूममधून बाहेर आल्यानंतर तिच्या डोळ्यांसमोर हा संतापजनक प्रकार उघडकीस आला. तिने आरोपीला जाब विचारला असता, त्याने अश्लील भाषेत शिवीगाळ करत तिच्याशीही गैरवर्तन केले. इतकेच नव्हे, तर मी तुझ्या मुलीशी संबंध ठेवीन अशी अमानुष धमकी देत तिच्यावर हल्ला चढवला. आरोपीने तिच्या छातीवर दाब देत तिला जोरात ढकलले, तसेच घरातील चाकूने वार करण्याचाही प्रयत्न केला. रागाच्या भरात त्याने पाण्याचा माठ तिच्या अंगावर फेकून मारला. महिलेच्या आरडाओरडचामुळे शेजारी तातडीने धावून आल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर पीडित महिलेने त्वरित संगमनेर शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा रजिस्टर नंबर ३००/२०२६ अंतर्गत आरोपीविरुद्ध गंभीर गुन्हे नोंदवले.

आरोपीवर भारतीय नागरिक संहिता २०२३ मधील कलम ६४(२)(ख)(ऋ), ६५(२), ७४, ७५, ११८(१), ३५१(२), ३५२ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४, ६, ८ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (पान ६ वर)

## अखेर संसदेत महिला आरक्षण विधेयक सादर



मुंबई (वृत्तसंस्था)

संसदेत आज महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारी तीन विधेयके सादर करण्यात आली. यामुळे विरोधी पक्षांकडून विरोध सुरू झाला. सरकारला संविधानाचे अपहरण करायचे आहे, असे सांगत काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी या विधेयकांना सर्वप्रथम विरोध केला.

त्यानंतर, मुस्लिम महिलांना आरक्षण दिल्याशिवाय त्याला अर्थ नाही, असे सांगत सपाचे खासदार धर्मेंद्र यादव यांनीही या विधेयकांना विरोध केला. त्यावर अमित शाह म्हणाले, धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देणे घटनाबाह्य आहे की नाही, हा प्रश्नच उद्भवत नाही. अखिलेश यादव म्हणाले, संपूर्ण देशाला अर्ध्या लोकसंख्येसाठी आरक्षण हवे आहे. मला जाणून घ्यायचे आहे की मुस्लिम महिलांचे काय? त्यावर अमित शाह म्हणाले, समाजवादी पक्ष आपली सर्व तिकिटे मुस्लिम महिलांना देऊ शकतो आणि आम्हाला कोणताही आक्षेप नाही.

सुधारणा विधेयकानुसार लोकसभेतील खासदारांची संख्या सध्याच्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. राज्यांना ८१५ जागा आणि केंद्रशासित प्रदेशांना ३५ पर्यंत जागा मिळतील. जागांचीकायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान (१३१ वी सुधारणा) विधेयक आणि पुनर्रचना विधेयक (सुधारणा) विधेयक सादर करतील, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह केंद्रशासित प्रदेश कायदा (सुधारणा) विधेयक, २०२६ विधेयक सादर करतील. यावर चर्चेसाठी १८ तासांचा वेळ निश्चित केला आहे. यानंतर राज्यसभेत १० तास चर्चा होईल. पंतप्रधान मोदी उद्याच चर्चेदरम्यान आपले म्हणणे मांडू शकतात. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बुधवारी विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत बैठक घेतली. ते म्हणाले की, विरोधक महिला आरक्षणाच्या विरोधात नाहीत, परंतु लोकसभेतील जागा वाढवण्याच्या विरोधात आहेत. संपूर्ण विरोधक संसदेत याच्या विरोधात मतदान करतील. या बैठकीत राहुल गांधी आणि टीएमसी, आरजेडी, शिवसेना (यूबीटी), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद गट), आपचे नेते उपस्थित होते. नेमकी संख्या निश्चित करण्यासाठी मतदारसंघांची पुनर्रचनाही केली जाईल.

## सजग होत महिलांनी भोंदू बुवा, बाबा, मौलवी यांच्यापासून दूर राहावे

### अंनिस कार्यकर्ते इल्हे यांचे आवाहन



युवावार्ता (प्रतिनिधी)


संगमनेर - अंधश्रद्धा ही भारतीय समाजाला लागलेली मोठी कीड असून देवाधर्माच्या नावाखाली अनेक बदमाश बुवा- बाबा- मौलवी समाजाला फसवत आहेत. उच्च शिक्षण घेतलेल्या महिला, समाजातील जाणकार व्यक्ती, पुढारी खरात बाबा सारख्या अत्यंत नीच बाबांच्या हातचालाखी, कर्मकांडांना बळी पडत शारीरिक, आर्थिक फसवणुकीला बळी पडत आहेत. असे विचार राष्ट्रसेवा दलाचे सामाजिक कार्यकर्ते सुखदेव इल्हे यांनी व्यक्त केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने आयोजित समता सप्ताहमध्ये सामाजिक कार्यकर्ते सुखदेव यांनी वैज्ञानिक जाणीव प्रकल्प अंतर्गत सप्रयोग व्याख्यान दिले. समाजाला अंधश्रद्धेतून मुक्त करणाऱ्या व समतेचा संदेश देणाऱ्या महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित अंधश्रद्धामुक्त समाज निर्मितीसाठी शिक्षण घेत असताना मुलींनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगत सजग राहत विविध धर्मातील भोंदूगिरीला विरोध केला पाहिजे.

पाण्याचा प्रसाद, नारळातून गंडादोरा काढणे, गडव्यातून गंगा आवतरणे, मंत्र सामर्थ्याने दीपप्रज्वलन करणे, यासारख्या प्रयोगामधील चमत्कार, त्यामागील विज्ञान मुलींना समजून सांगत त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. लग्न जमवताना पत्रिका सारख्या थोतांडावर विश्वास ठेवण्यापेक्षा मुला-मुलींमधील कर्तृत्व, व्यसनासारख्या सवयी, त्यांचा मित्रपरिवार पाहिला पाहिजे, मुलामुलींचा रक्तगट तपासला पाहिजे. राहू केतू हे ग्रह नाहीतच, शनी मंगळाला फक्त माणसं माणसाला त्रास देण्याचे काम असू शकत नाही, पृथ्वीपासून कोट्यावधी किलोमीटर दूर असलेले हे ग्रह मनुष्य प्राण्यावर कसा परिणाम करू शकतात? असा प्रश्न इल्हे यांनी उपस्थित केला. जगात भूत कुठेही नसून ते आपल्या मनात घर करून असते. अंगात येणे ही मानसिक विकृती आहे. देव अंगात येणे ही गोष्ट फक्त झोपडपट्टीतच का घडते.. अशा अनेक प्रश्नांवर मुलींनी चर्चा केली. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या माध्यमातून आपण समता, बंधुता,वैज्ञानिक दृष्टिकोन, या मूल्यांचा जीवन जगताना उपयोग केला पाहिजे. सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वस्तीगृह, संगमनेर येथे नुकताच संपन्न झालेल्या कार्यक्रम रजत अवसक, अधिक्षक योगिता कुलाल, यांनीही चर्चेत भाग घेतला.

रजत अवसक यांनी सांगितले की विवेकवादी समाज निर्मितीसाठी संविधान जागृती व महिला प्रबोधन ही काळाची गरज आहे. यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद, विभागप्रमुख डॉ.बबन जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. या समता सप्ताह मध्ये घुलेवाडी मुलांचे शासकीय वस्तीगृह येथे संगमनेर दक्षता समितीचे सदस्य हनुमंत उबाळे यांचे भारतीय संविधान निर्मितीत बाबासाहेबांचे योगदान या विषयावरती व्याख्यानाचा कार्यक्रम आहे पार पाडला यावेळी त्यांनी नागरिकांची मूलभूत हक्क जबाबदाऱ्या व कर्तव्य या विषयावरती मुलांची संवाद साधला.





# विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान त्याच दिवशी निकालही

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली असून विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला असून १२ मे २०२६ रोजी मतदान पार पडणार आहे. त्याच दिवशी निकालही जाहीर केला जाणार असल्याने एका दिवसातच या निवडणुकीचा फैसला होणार आहे. सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

या निवडणुकीचे महत्त्व यासाठीही वाढले आहे की, विधान परिषदेतील नऊ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार आहे. त्यामुळे या जागा भरणे अत्यावश्यक झाले आहे. सध्या विधानसभेतील संख्याबळ पाहता भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि महाविकास आघाडी यांच्यात जागावाटपाचे गणित रंगू लागले आहे. विद्यमान परिस्थितीत भाजपला पाच, शिवसेनेला दोन, राष्ट्रवादीला एक आणि महाविकास आघाडीला एक जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, राष्ट्रवादीकडे अतिरिक्त १३ मते असल्यामुळे या निवडणुकीत समीकरणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर महायुतीने अधिक उमेदवार रिंगणात उतरवण्याचा निर्णया निवडणुकीत ज्या सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड, प्रवीण दटके आणि रमेश कराड या नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे अनेक दिग्गज पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवार निवडताना पक्षांना मोठी कसरत करावी लागणार आहे.य घेतला, तर ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी होईल. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत राजकीय डावपेच आणि मतांची जुळवाजुळव सुरू राहण्याची चिन्हे आहेत. या निवडणुकीत ज्या सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड, प्रवीण दटके आणि रमेश कराड या नेत्यांचा समावेश आहे.

# ध्रुव ग्लोबल स्कूलच्या 'योग' विद्येचा राज्यस्तरावर डंका

## नऊ विद्यार्थ्यांना शासकीय क्रीडा शिष्यवृत्ती; संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने देण्यात येणारी प्रतिष्ठेची राज्य क्रीडा शिष्यवृत्ती यंदा संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलच्या नऊ प्रतिभावान योगपटूंना जाहीर झाली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शालेय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या या खेळाडूंनी योगासनांतील आपल्या कौशल्याच्या जोरावर ही कामगिरी फत्ते केली आहे. राज्याच्या क्रीडा क्षेत्रात या विद्यार्थ्यांच्या यशाचे सध्या सर्वत्र कौतुक होत असून, संगमनेरच्या क्रीडा परंपरेत यामुळे एक नवा अध्याय जोडला गेला.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या यादीनुसार, ध्रुव ग्लोबल स्कूलच्या नऊ खेळाडूंना त्यांच्या कामगिरीच्या स्वरुपानुसार भरघोस शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. यामध्ये योगासनांच्या विविध राष्ट्रीय व राज्य स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या अंश मयेकर याला सर्वाधिक २० हजार २०० रुपये शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. त्याखालोखाल प्रणव साहु याला १८ हजार रुपये, तर आर्यन खरात, देवांशी वाकळे, प्रांजल व्हन्ना, तन्मय म्हाळसकर आणि तृप्ती डोंगरे या पाच खेळाडूंना प्रत्येकी ११ हजार २५० रुपये देण्यात येणार आहेत. तसेच रोहन तायडे व रुद्राक्षी भावे या दोघांना प्रत्येकी ८ हजार ९५० रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.

कोणतेही यश हे सहजासहजी मिळत नसते, तर त्यामागे अथक परिश्रम आणि सातत्य असते, हे ध्रुवच्या या विद्यार्थ्यांनी सिद्ध करुन



दाखवले आहे. आपला दैनंदिन शालेय अभ्यास सांभाळत असतानाच, या खेळाडूंनी दररोज पहाटे योगाभ्यास केला. तासन् तास चालणारी सराव सत्रे, कठीण आसनांचा सराव आणि शिस्तबद्ध जीवनशैली यामुळेच त्यांनी शालेय स्तरापासून राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या स्पर्धांमध्ये पदकांचा पाऊस पाडला. या यशात क्रीडा प्रशिक्षक विष्णू चक्रवर्ती, मंगेश खोपकर, मृणाली बाणाईत व ऋषभ शर्मा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. प्रशिक्षकांनी या विद्यार्थ्यांच्या कौशल्याला पैलू पाडण्याचे काम केल्यानेच आज हे खेळाडू राज्याचे प्रतिनिधित्व करत आहेत.

महाराष्ट्र राज्य शासन खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवते. त्यापैकी 'थेट आर्थिक साहाय्य' ही शिष्यवृत्ती योजना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. शालेय आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळवणार्या खेळाडूंच्या शैक्षणिक आणि क्रीडा विकासासाठी ही मदत दिली जाते. ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंनी गेल्या काही वर्षांत योगासनांमध्ये मिळवलेली ही सातत्यपूर्ण प्रगती राज्याच्या क्रीडा विभागाच्या नजरेतून सुटली नाही.

ध्रुव ग्लोबल स्कूलच्या या यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हा.चेअरमन गिरीश मालपाणी आणि प्राचार्या अर्चना घोरपडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# संतप्त शेतकऱ्यांचा भर उन्हात वीज उपकेंद्रावर मोर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी)

सध्या उन्हाची तिव्रता प्रचंड वाढलेली आहे. परिणामी, वारंवार खंडित होणाऱ्या विज पुरवठ्यामुळे संतत्त शेतकाऱ्यांनी महावितरणच्या धांदरफळ खुर्द परिसरातील कार्यालयावर काल बुधवारी (दि. १५) मोर्चा काढत रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.



गेल्या काही दिवसांपासून धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द, सांगवी, नांदुरी दुमाला, निमज, मिर्झापूर यांसह परिसरातील गावांमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. यातच उन्हाचे दिवस असल्याने शेतीसाठी कमी दाबाने वीज उपलब्ध होते. या विरोधात ग्रामस्थ व शेतकरी आक्रमक झाले होते. या आंदोलनात कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग घुले, माजी जि.प. सदस्य रामहरी कातोरे, डॉ. माधवराव कानवडे, संपतराव डोंगरे, दत्ता कोकणे, शरद कोकणे, मारुती कवडे, सतीश खताळ, शुभम घुले, संगम आहेर, शांताराम गोरडे, देविदास खताळ, सुरेश कातोरे, अण्णा खताळ, भाऊराव शिरतार, अविनाश खताळ, किशोर खताळ, राजेंद्र बोडके, सरपंच लताताई खताळ, सरपंच नवनाथ कातोरे उपस्थित होते.

वीज पुरवठा सुरळीत करण्याबरोबर लवादाच्या निर्णयानुसार रोटेशनच्या कालावधीमध्ये ११ तास वीज मिळावी, यासाठी सुमारे चार तास भर उन्हामध्ये रास्ता रोको करण्यात आला. अकरा तास वीज मिळाली नाही तर गुराढोरांसह मोठे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. सध्या सर्वत्र उन्हाची तीव्रता वाढत असून शेतीसह पशुधनासाठी पाणी मिळण्याकरीता वीज पुरवठा सुरळीत झाला पाहिजे. मात्र महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे वीज वारंवार खंडित होत आहे. यामुळे धांदरफळ परिसरातील विविध गावांमध्ये शेतकरी चांगलेच आक्रमक झाले होते. यावेळी शुभम घुले, संगम आहेर, शांताराम गोरडे, देविदास खताळ, सुरेश कातोरे, अण्णा खताळ, भाऊराव शिरतार, अविनाश खताळ, किशोर खताळ, राजेंद्र बोडके, रामहरी कातोरे, पांडुरंग घुले, दत्ता कोकणे, संपतराव डोंगरे, अरुण गुंजाळ, शरद कोकणे, अरुण गुंजाळ आदी उपस्थित होते.

# धांदरफळ वीज उपकेंद्राच्या क्षमतेत वाढ शेतकऱ्यांसाठी ट्रान्सफॉर्मर सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

**आ. अमोल खताळ यांच्या प्रयत्नातून ५ एमव्हीए वरून १० एमव्हीए; क्षमता वाढ**



सध्या उन्हाची तिव्रता प्रचंड वाढलेली आहे. परिणामी, वारंवार खंडित होणाऱ्या विज पुरवठ्यामुळे संतत्त शेतकाऱ्यांनी महावितरणच्या धांदरफळ खुर्द परिसरातील कार्यालयावर काल बुधवारी (दि. १५) मोर्चा काढत रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द, सांगवी, नांदुरी दुमाला, निमज, मिर्झापूर यांसह परिसरातील गावांमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. यातच उन्हाचे दिवस असल्याने शेतीसाठी कमी दाबाने वीज उपलब्ध होते. या विरोधात ग्रामस्थ व शेतकरी आक्रमक झाले होते. या आंदोलनात कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग घुले, माजी जि.प. सदस्य रामहरी कातोरे, डॉ. माधवराव कानवडे, संपतराव डोंगरे, दत्ता कोकणे, शरद कोकणे, मारुती कवडे, सतीश खताळ, शुभम घुले, संगम आहेर, शांताराम गोरडे, देविदास खताळ, सुरेश कातोरे, अण्णा खताळ, भाऊराव शिरतार, अविनाश खताळ, किशोर खताळ, राजेंद्र बोडके, सरपंच लताताई खताळ, सरपंच नवनाथ कातोरे उपस्थित होते.

वीज पुरवठा सुरळीत करण्याबरोबर लवादाच्या निर्णयानुसार रोटेशनच्या कालावधीमध्ये ११ तास वीज मिळावी, यासाठी सुमारे चार तास भर उन्हामध्ये रास्ता रोको करण्यात आला. अकरा तास वीज मिळाली नाही तर गुराढोरांसह मोठे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

सध्या सर्वत्र उन्हाची तीव्रता वाढत असून शेतीसह पशुधनासाठी पाणी मिळण्याकरीता वीज पुरवठा सुरळीत झाला पाहिजे. मात्र महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे वीज वारंवार खंडित होत आहे. यामुळे धांदरफळ परिसरातील विविध गावांमध्ये शेतकरी चांगलेच आक्रमक झाले होते. यावेळी शुभम घुले, संगम आहेर, शांताराम गोरडे, देविदास खताळ, सुरेश कातोरे, अण्णा खताळ, भाऊराव शिरतार, अविनाश खताळ, किशोर खताळ, राजेंद्र बोडके, रामहरी कातोरे, पांडुरंग घुले, दत्ता कोकणे, संपतराव डोंगरे, अरुण गुंजाळ, शरद कोकणे, अरुण गुंजाळ आदी उपस्थित होते.

सलग ११ तास विज पुरवठा मिळावा. जुने जीर्ण झालेले पोल आणि विद्युत तार यांचे व्यवस्थापन करावे. नदीच्या कडेला बंद असलेले रोहित्र सुरळीत सुरू करावे. अकोले वरून येणारी ३३ के. व्ही. धांदरफळ फिडरचा विद्युत पुरवठा सुरळीत करावा. शेतीसाठी कमी दाबाने विज पुरवठा झाल्यास तो भरून काढावा, अशा विविध मागण्या शेतकऱ्यांनी यावेळी करण्यात आल्या.

# नाशिकमध्ये महिला छळ व धर्मांतर प्रकरणी आठ जणांविरोधात गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिकमधील एका नामांकित कंपनीत महिला छळवणूक आणि धर्मांतराशी संबंधित गंभीर प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणी नाशिक येथील मुंबई नाका आणि देवळाली पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणाची मुख्य सूत्रधार म्हणून समोर आलेली २६ वर्षीय निदा खान मात्र गेल्या २० दिवसांपासून फरार आहे.



पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, कंपनीत मॅनेजर आणि टीम लीडर म्हणून काम करणारी निदा खान ही महिलांना टार्गेट करून त्यांची मानसिक छळवणूक आणि धर्मांतरासाठी दबाव टाकण्यामागे प्रमुख भूमिका बजावत होती. रोजच्या मीटिंग्स आणि कामाच्या नियोजनाच्या माध्यमातून हिंदू मुलींना त्रास देणे आणि त्यांच्यावर दबाव टाकणे हे नियोजनबद्ध पद्धतीने घडवून आणले जात असल्याचा धक्कादायक उलगडा झाला आहे.या प्रकरणात कंपनीची एचआर अश्विनी चैनानी हिला अटक करण्यात आली असून तिच्या चौकशीत अनेक महत्त्वाचे तपशील समोर आले आहेत. सहा पुरुष आणि दोन महिला आरोपींच्या सहभागातून हा प्रकार व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून चालवला जात असल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, निदा खानच्या शोधासाठी पोलिसांची तीन पथके रवाना करण्यात आली असून तिचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. तपास यंत्रणेला या प्रकरणामागे आंतरराष्ट्रीय रॅकेट सक्रिय असल्याचा संशयही व्यक्त करण्यात येत आहे.निदा खानची अटक या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची कडी मानली जात असून तिच्या चौकशीतून या संपूर्ण प्रकरणाचा मास्टरमाइंड आणि संभाव्य नेटवर्क उघड होण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली असून कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

# सीबीएसईकडून दहावीचा निकाल जाहीर

पुणे (वृत्तसंस्था)- केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल ९३.६६ टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे. बोर्डानं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे.

दरवर्षीप्रमाणं यंदा देखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी मुलांना मागं टाकत बाजी मारली आहे. मुलांच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक आहे. सीबीएसईनं अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही. मात्र, गुणवत्ता प्रमाणपत्र त्या त्या विषयात अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणार आहेत. सीबीएसईनं दहावीचा निकाल जाहीर केल्यानं जवळपास २४ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली आहे.

# राज्यसभा खासदार अशोक मित्तलांच्या शिक्षण संस्थांवर ईडीची कारवाई

मुंबई (वृत्तसंस्था)

ईडीने बुधवारी आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार अशोककुमार मित्तल आणि त्यांच्या कुटुंबातील शिक्षण संस्थांवर फेमा (परकीय चलन व्यवस्थापन कायदा) उल्लंघनाच्या तपासांतर्गत सर्च ऑपरेशन केले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार जालंधर, आसपासचे भाग आणि गुरुग्राममधील सुमारे १० ठिकाणांवर कारवाई करण्यात आली.



यामध्ये फगवाडा येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एलपीयू), गुरुग्राममधील दोन संलग्न संस्था टेट्र कॉलेज ऑफ बिझनेस आणि मास्टर्स युनियन कॉलेज ऑफ बिझनेसच्या परिसरांचाही समावेश आहे. तपास यंत्रणेला एलपीयूच्या निधीच्या गैरवापराच्या तक्रारी मिळाल्या होत्या. नुकतेच आपने राघव चड्ढा यांच्या जागी राज्यसभेत अशोक मित्तल यांना पक्षाचे उपनेते बनवले आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी छाप्यांवर टीका केली आहे.

बुधवारी सकाळी पंजाब सरकारने राघव चड्ढांची झेड प्लस सुरक्षा काढून घेतली. दुपारनंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने त्यांना झेड सुरक्षा दिली आहे. त्यांना असलेले संभाव्य धोके पाहून हा निर्णय घेण्यात आला. खा. मित्तल एलपीयूचे चान्सलर, पत्नी रश्मी प्रो-चान्सलर, मुलगा प्रथम शिक्षण संस्थांचे मालक आहेत. फगवाडामध्ये एलपीयू ६०० एकरांवर उभी आहे. ही सर्वात मोठी सिंगल कॅम्पस प्रायव्हेट युनिव्हर्सिटी आहे. मित्तलांचा लव्हली स्वीट्स नावाचा मिठाई ब्रँड आहे. भगवंत मान, तुमचा पक्ष चोर-लुटारूंचा आहे. पंजाबचे लोक राज्याच्या मंत्र्यांविरुद्ध खटले दाखल करत आहेत. तपास यंत्रणा काही भ्रष्ट खासदारांना पकडत आहेत. मोदींचे धोरण क्लीन इंडिया आहे, याअंतर्गत घाण नक्कीच साफ होईल. असे रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी सांगितले.

# जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क

## लसीकरण मोहिमेला वेग- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जिल्हा महिती कार्यालयाकडून -**

अहिल्यानगर - जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

**जपानी मेंदूज्वराची वैशिष्ट्ये आणि धोका**

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.

**राज्यातील सद्यस्थिती-**

राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.



**लसीकरण मोहिमेची प्रगती**

एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान लसीकरण मोहिमेत राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. पहिल्या डोसचे एकूण कव्हरेज ८९.२६ टक्के तर दुसऱ्या डोसचे ७८.६८ टक्के आहे. धाराशिव (९९.५९ टक्के), लातूर (९७.८४ टक्के) आणि सोलापूर (९५ टक्क्यांपेक्षा जास्त) जिल्ह्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र रायगड ५५ टक्के पहिला डोस व ४८ टक्के दुसरा डोस, पुणे आणि पीसीएमसी भागात दुसऱ्या डोसचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसून आले आहे.

**निदान व उपचार सुविधा-**

राज्यात जपानी मेंदूज्वराच्या निदानासाठी नागपूर, गडचिरोली, सेवाग्राम (वर्धा), भंडारा आणि गोंदिया येथे पाच सेंटीनेल केंद्रे कार्यरत आहेत. तसेच १६ जिल्ह्यांमध्ये बाल अतिदक्षता विभाग (पीआयसीयू) सुरू असून रुग्णांना आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

विदर्भ भाग सर्वाधिक संवेदनशील

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार विदर्भ हा जपानी मेंदूज्वरासाठी सर्वाधिक संवेदनशील भाग आहे. ग्रामीण व कृषी क्षेत्रात डासांची वाढ, तसेच डुक्कर व पक्ष्यांच्या संपर्कामुळे संसर्गाचा धोका अधिक असतो. काही शहरी व उपनगरी भागातही साथीचा धोका संभवतो.

**नियंत्रणासाठी व्यापक उपाययोजना**

राज्यात नियमित लसीकरण, विशेष मोहिमा, रक्त नमुना तपासणी, डास नियंत्रणासाठी धूरफवारणी, क्युलेक्स डासांचे सर्वेक्षण, जनजागृती, डासांच्या उत्पत्तीस्थळांवर गप्पी मासे सोडणे तसेच स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत.

**जनतेला आवाहन**

जपानी मेंदूज्वर हा आजार विशेषतः लहान मुलांसाठी धोकादायक असल्याने नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे, डासांपासून संरक्षण करावे आणि ताप किंवा मेंदूशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# संगमनेरकर तरुणालाही गंडा; 'हनिमून लुटारु नवरी'चा पर्दाफाश



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
लग्नाच्या आमिषाने फसवणूक करून हनिमूनच्या रात्रीच नवऱ्याच्या घरातील दागिने, रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू लंपास करणाऱ्या 'चोरटी नवरी'च्या धक्कादायक टोळीचा पर्दाफाश झाला असून, या प्रकरणात साकूर (ता. संगमनेर) येथील एका तरुणाचीही फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे संगमनेर तालुक्यात खळबळ उडाली आहे. मुंबईतील काशिमीरा पोलिसांनी नेहा अरुण जाधव (वय २२) आणि तिचा तथाकथित बाप केसरीमल लक्ष्मीलाल रांका (वय ४१) यांना अटक केली आहे. तपासात या बाप-लेकीच्या जोडीनं संगमनेर, मुंबई, नाशिक, जळगावसह विविध ठिकाणी अशाच प्रकारे किमान पाच जणांना गंडा घातल्याचे उघड झाले आहे.

संगमनेर तालुक्यातील साकूर येथील एका तरुणाशी आरोपी तरुणीने लग्न केल्याची माहिती समोर आली असून, लग्नानंतर अल्पावधीतच हनिमूनच्या दिवशी घरातील दागिने व रोख रक्कम घेऊन ती फरार झाली. या प्रकरणाचा व्हिडिओही समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिरा-भाईंदर येथील इस्टेट एजंट सेवलकुमार नाडर (वय ५३) यांनाही या टोळीने लक्ष्य केले. केसरीमल रांकाने लग्न जुळवून देण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून ४४ हजार रुपये घेतले आणि नेहासोबत लग्न लावून दिले. मात्र, लग्नानंतर अवघ्या दोन दिवसांतच नवरीने घरातील सुमारे ५ लाखांचा ऐवज घेऊन पळ काढला. तपासात उघड झाले की, ही टोळी विशेषतः उशिरा लग्न ठरणारे, विधुर किंवा एकटे राहणारे पुरुष हेरते. साधा लग्नसोहळा उरकून हनिमूनच्या दिवशीच घरातील दागिने, रोकड आणि मौल्यवान वस्तू घेऊन नवरी फरार होते. त्यानंतर बाप-लेकीचा संपर्क पूर्णपणे तुटतो.

या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, या टोळीने आणखी किती जणांना गंडा घातला आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर संगमनेर परिसरातील नागरिकांनी लग्न जुळवताना पूर्ण खातरजमा करावी, अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवताना सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.


# राहुरीत उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी प्रक्रिया पूर्ण

राहुरी
(जिल्हा माहिती कार्यालय)-
राहुरी विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी तहसील कार्यालय, राहुरी येथे संपन्न झाली. या तपासणी प्रक्रियेत एकूण ७ उमेदवारांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवून खर्चाची प्रमाणके व तपासणी नोंदवही सादर केली. खर्च पथकाने सर्व कागदपत्रांची बारकाईने तपासणी करून ही प्रक्रिया पूर्ण केली.

यावेळी खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी उमेदवारांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचे निरसन करून आवश्यक मार्गदर्शन केले. सहायक खर्च निरीक्षक अजय प्रकाश, नोडल अधिकारी (खर्च) शैलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी प्रक्रिया सुरळीत पार पडली.

याप्रसंगी लेखाधिकारी माणिक नागरे, सहायक लेखाधिकारी संजय आगलावे, पथक प्रमुख (खर्च) आनंद साठे, प्रवीण मुनोत यांच्यासह खर्च पथकातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# 'अनुभवाचे अंतरंग' चे रविवारी प्रकाशन




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अशोक विमल विश्वनाथ शेटे लिखित 'अनुभवाचे अंतरंग' या पहिल्या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा १९ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कथासंग्रहातील आशय, भाषा आणि विषयांची व्याप्ती लक्षात घेता, त्याबद्दलचे समीक्षण खालीलप्रमाणे आहे.

समीक्षण - 'अनुभवाचे अंतरंग' - माणुसकी आणि वास्तवाचा आरसा, लेखक :- अशोक विमल विश्वनाथ शेटे, प्रकार : लघुकथासंग्रह, प्रकाशक - चपराक, मूल्य - १५० रु

मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे आणि शिक्षकी पेशाचे प्रतिबिंब उमटवणारे अनेक लेखक झाले आहेत, परंतु अशोक शेटे यांचा 'अनुभवाचे अंतरंग' हा कथासंग्रह एका वेगळ्याच संवेदनशीलतेने समोर येतो. हा केवळ एक कथासंग्रह नसून लेखकाने आपल्या सभोवतालच्या वास्तवातून टिपलेल्या मानवी भावभावनांचा जिवंत दस्तऐवज आहे.

<u>विषयांचे वैविध्य आणि सामाजिक भान -</u>
या संग्रहातील कथांची धाटणी ही ग्रामीण जीवनातील वास्तव, शिक्षकी पेशातील कडू-गोड अनुभव आणि सामाजिक विसंगती यांवर आधारित आहे.

<u>शिक्षकी जीवनाचे प्रतिबिंब :-</u>
'उपक्रमांचा किडा', 'माणुसकीचा झेंडा' आणि 'साक्ष' यांसारख्या कथांमधून लेखकाने शिक्षकी पेशातील आव्हाने, प्रशासकीय ताणतणाव आणि विद्यार्थ्यांशी असलेले भावनिक नाते यांचे यथार्थ चित्रण केले आहे. विशेषतः शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त करावी लागणारी अशैक्षणिक कामे (उदा. पोलीस पंचनामा) आणि त्यातून होणारी कुचंबणा 'साक्ष' या कथेतून प्रकर्षाने मांडली आहे.

<u>ग्रामीण वास्तव आणि संघर्ष :-</u>
'माझ्या लग्नाची गोष्ट' या कथेतून ग्रामीण तरुणाची आर्थिक ओढाताण आणि मध्यमवर्गीय कुटुंबाचा लग्नासाठीचा संघर्ष उभा केला आहे. 'बांधाचा बळी' ही कथा जमिनीच्या तुकड्यासाठी रक्ताच्या नात्यात येणारा दुरावा आणि मत्सर यावर गंभीर भाष्य करते.

<u>स्त्री जाणीव आणि माणुसकी :-</u>
'पतीव्रता' या कथेतून परिस्थितीमुळे पदरी आलेल्या अनैतिकतेच्या पलीकडे जाऊन संसारासाठी झटणाऱ्या स्त्रीचे उदात्त रूप लेखकाने रेखाटले आहे. तसेच 'न हरवलेली सुमन' मधील ग्रामीण विनोद मनाला स्पर्श करून जातो.

<u>लेखनशैली आणि भाषा -</u>
अशोक शेटे यांची भाषा अत्यंत साधी, सोपी आणि प्रवाही आहे. अलंकारिक शब्दांचा बडेजाव न करता, अगदी 'पारावरच्या गप्पां'प्रमाणे लेखक वाचकांशी संवाद साधतो. कथेतील संवाद ग्रामीण बोलीभाषेचा गंध जपणारे असल्याने कथा अधिक वास्तववादी वाटतात.

<u>सकारात्मक दृष्टिकोन -</u>
पुस्तकाच्या मनोगतात म्हटल्याप्रमाणे, आयुष्य कितीही कठीण असले तरी त्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. संकटातही हसू शोधणारी आणि माणुसकी जपणारी माणसे या कथांचे मुख्य आकर्षण आहेत. लेखकाने समाजातील दांभिकतेवर प्रहार करतानाच चांगुलपणाचा परिपोष कसा होईल, याकडे विशेष लक्ष दिले आहे.

<u>निष्कर्ष -</u>
'अनुभवाचे अंतरंग' हा कथासंग्रह वाचकाला अंतर्मुख करणारा आहे. स्वतः शिक्षक असल्याने लेखकाची दृष्टी ही संस्कारक्षम आहे, ज्याची किनार त्यांच्या आजोबांच्या आणि वडिलांच्या शिकवणीतून मिळाली आहे. मराठी साहित्यात एक 'आश्वासक कथाकार' म्हणून अशोक शेटे या संग्रहाद्वारे नक्कीच आपली मोहोर उमटवतील. प्रस्तुत पुस्तक हे केवळ कथांचे संकलन नसून ती मानवी जीवनाच्या संघर्षाची आणि विजयाची गाथा आहे. १९ एप्रिल २०२६ रोजी होणारा हा प्रकाशन सोहळा वाचकांसाठी मेजवानी ठरणार आहे. पुस्तक बुकगंगा, मेझॉन व फ्लिपकार्ट वर उपलब्ध. ९९२११६९२८६ या नंबर वर फोन करून आपण प्रकाशन पूर्व सवलतीच्या दरात पुस्तक मागवू शकता.



**- संजय अहिरे,**
**उपसंपादक, युवावार्ता**

# संगमनेरमध्ये भगवान परशुराम जयंतीनिमित्त हृदयरोग मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर येथील भगवान परशुराम जयंती उत्सव समितीच्या वतीने अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भगवान श्री परशुराम जयंती उत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. यंदा हा उत्सव आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा करताना संगमनेरकरांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत सामाजिक उपक्रमालाही प्राधान्य देण्यात आले आहे.

सध्याच्या अस्थिर जीवनशैलीमुळे वैद्यकीय समस्यांमुळे तणाव वाढत असून, हृदयरोगासारख्या आजारांचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. विशेषतः कोविडनंतर हृदयरोगाच्या स्वरूपात अनेक बदल आढळून येत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना हृदयरोगाची बदलती लक्षणे, प्रतिबंधक उपाय आणि उपचार यांची सखोल माहिती मिळावी, या उद्देशाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या व्याख्यानासाठी संगमनेरचे सुपुत्र व हृदयरोगतज्ज्ञ डॉ. प्रणव आशुतोष माळी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. नाशिक व शिर्डी येथील नामांकित रुग्णालयांमध्ये त्यांनी अनेक जटिल हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या असून, हृदयरोग विषयातील त्यांचा अभ्यास व्यापक आहे. या व्याख्यानात ते निरोगी जीवनाची गुरुकिल्ली, हृदयरोगाची लक्षणे, काळजी घेण्याचे उपाय आणि उपचार याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

सदर व्याख्यान शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता घास बाजार येथील मदन कुलकर्णी हॉल येथे होणार असून, हे व्याख्यान सर्वांसाठी खुले आहे.

या कार्यक्रमास संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन ब्राह्मण प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर शिरसागर, कार्याध्यक्ष वैभव कुलकर्णी, युवा अध्यक्ष उत्कर्ष जोशी, महिला अध्यक्ष सौ. आरती धायगुडे तसेच प्रकल्प प्रमुख धनु भाऊ धायगुडे, उदय देशपांडे, अनिरुद्ध उपासनी, कौस्तुभ कुलकर्णी, राहुल जोशी आदी मान्यवरांनी केले आहे.

# संगमनेर चावडीतील कारभाराचा ...

पान नं. १ वरुन-

या सगळ्या प्रकारामुळे एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो - शासकीय कागदपत्रांवर खासगी व्यक्ती हाताळणी करत असतील, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? तहसीलदार आणि प्रांत अधिकारी यांची भूमिका काय? महसूल खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष का?

नागरिकांच्या मते, एजंटगिरीचा हा प्रकार केवळ चावडीपुरता मर्यादित नसून तालुक्यातील अनेक ठिकाणी सुरू आहे. यातून निर्माण होणारा काळा पैसा नेमका कुणाच्या खिशात जातो, याबाबतही मोठ्या प्रमाणात चर्चा रंगत आहे.

आ. अमोल खताळ यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून नागरिकांच्या भावना व्यक्त केल्या असल्या, तरी केवळ धडक भेटीपुरतेच हे मर्यादित राहणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खऱ्या अर्थाने बदल घडवण्यासाठी महसूल विभागाने तातडीने कर्मचारी नियुक्ती, स्वतंत्र कार्यालयाची उभारणी आणि एजंटगिरीवर कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

# ज्ञानमाता विद्यालयात महात्मा जोतिबा फुले जयंती उत्साहात साजरी



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
येथील ज्ञानमाता विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनसंघर्षावर आपली मते मांडली. शिक्षणाशिवाय गती गेली... या सूत्राचा आधार घेत, जोतिबांनी प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाची आणि समाजसुधारणेची मुहूर्तमेढ कशी रोवली, यावर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला.

विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, महात्मा फुले हे केवळ एक समाजसुधारक नव्हते, तर ते आधुनिक भारताच्या प्रगतीचे शिल्पकार होते. त्यांचे कार्य आजही आपल्याला अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्ती देते. उपप्राचार्या अर्चना डोंगरे यांनी देखील आपले मनोगत शब्दबद्ध केले. त्यांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यातील त्यागाच्या नात्याचे महत्त्व सांगून, विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातून जिद्द आणि चिकाटी हे गुण आत्मसात करावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थित मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांना महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

**विद्येविना मती गेली,**
**मतीविना नीती गेली,**
**नीतीविना गती गेली,**
**गतीविना वित्त गेले,**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले.**

या ओळींचा जयघोष करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागाला बळ

## 'महिला व बाल विकास भवन' (अहिल्याभवन) उभारणीला मान्यता



अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-
महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना अधिक गती व सुसूत्रता मिळावी, तसेच त्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी जिल्ह्यात 'महिला व बाल विकास भवन' (अहिल्याभवन) उभारणीस मान्यता मिळाल्याने वेग आला आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूक्ष्म नियोजनातून, तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळाली असून, एकाच छताखाली तब्बल १३ विभागांची कार्यालये आणि सुमारे ११० अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

महिला व बालविकास विभागांतर्गत विविध योजना जिल्ह्यात स्वतंत्रपणे कार्यरत असल्या तरी, त्यांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये जावे लागत होते. या प्रक्रियेमुळे वेळ, श्रम आणि संसाधनांचा अपव्यय होत होता. या पार्श्वभूमीवर सर्व सेवा 'एकाच छताखाली' उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. 'अहिल्याभवन' या संकल्पनेतून उभारण्यात येणारे हे केंद्र महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

या भवनामध्ये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, महिला आर्थिक विकास महामंडळ, राज्य महिला आयोग, बाल विकास प्रकल्प कार्यालये, चाईल्ड हेल्पलाईन, बाल न्याय मंडळ, महिला सक्षमीकरण केंद्र आदी विविध विभागांची कार्यालये कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांना योजनांचा लाभ अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने मिळणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १५ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात ८ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला असून, पुढील दोन वर्षांत या भवनाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

फजिल्हाधिकारी कार्यालय परिसरातच जागा निश्चित करण्यात आल्यामुळे नागरिकांना सहज पोहोचता येईल, अशी सोय करण्यात आली आहे. महिला व बालविकास विभागाच्या योजनांचा प्रभाव वाढवण्यासाठी ही पायाभूत सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. विशेषतः महिला सक्षमीकरण, बाल संरक्षण, पोषण, शिक्षण आणि सुरक्षितता या क्षेत्रांत अधिक समन्वय साधता येणार असल्याने प्रशासनाची कार्यक्षमता वाढणार आहे.

महिला व बाल विकास भवन (अहिल्याभवन) उभारणीमुळे विभागातील सर्व सेवा एकत्रितपणे उपलब्ध होतील. नागरिकांना एका ठिकाणी सर्व सुविधा मिळाल्याने त्यांचा वेळ वाचेल आणि योजनांचा लाभ अधिक वेगाने मिळेल. हे भवन महिला सक्षमीकरणासाठी एक सक्षम व्यासपीठ ठरेल.

## संपादकीय...

# सोशल मीडियावर वाढणारी भोंदूगिरी

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात माहितीचा वेग अभूतपूर्व वाढला आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जग एका क्लिकवर उपलब्ध झाले असले, तरी याच माध्यमांचा गैरवापर करून फसवणुकीचे नवे प्रकारही समोर येत आहेत. विशेषतः भोंदूगिरी आणि अंधश्रद्धेचा प्रचार आता अधिक वेगाने आणि व्यापक पद्धतीने समाजमाध्यमांद्वारे होत असल्याचे चित्र दिसत आहे. पूर्वी गावोगावी, मठ-मंदिरांच्या परिसरात मर्यादित असणारी ही प्रवृत्ती आता थेट मोबाईलच्या पडद्यावर येऊन ठेपली आहे, ही बाब अधिक चिंताजनक ठरते. भोंदू बाबा, तथाकथित गुरू आणि चमत्कारांचे दावे करणारे लोक आज समाजमाध्यमांवर व्हिडिओ, थेट प्रक्षेपण आणि संदेशांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचत आहेत. आजार बरे करण्याचे दावे, नशा सोडवण्याचे उपाय, कौटुंबिक समस्या दूर करण्याची हमी किंवा भविष्य सांगण्याचे आमिष दाखवून अनेकांना आपल्या जाळ्यात ओढले जात आहे. या सगळ्या प्रक्रियेत वैज्ञानिक दृष्टिकोन पूर्णपणे बाजूला पडतो आणि भावनांचा गैरफायदा घेतला जातो. विशेष म्हणजे, या दाव्यांना कोणतेही शास्त्रीय आधार नसतानाही लोक त्यावर विश्वास ठेवतात, हे अधिक धोकादायक आहे. समाजमाध्यमांची एक मोठी वैशिष्ट्य म्हणजे माहितीचा वेग आणि प्रसार. एखादा व्हिडिओ किंवा संदेश काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. भोंदूगिरी करणारे लोक याच गोष्टीचा फायदा घेतात. आकर्षक सादरीकरण, भावनिक भाषा आणि बनावट अनुभवांच्या कथांद्वारे ते स्वतःची प्रतिमा उंचावतात. अनेक वेळा बनावट रुग्ण, बनावट अनुभव आणि खोट्या यशकथा दाखवून लोकांचा विश्वास संपादन केला जातो. यामुळे सामान्य माणूस सत्य आणि असत्य यामध्ये फरक करू शकत नाही. यामागील आणखी एक गंभीर बाब म्हणजे समाजातील वाढती असुरक्षितता. आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण, नैराश्य, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक अडचणी यामुळे माणूस मानसिकदृष्ट्या कमकुवत होत आहे. अशा वेळी तो जलद आणि सोपा उपाय शोधू लागतो. याच मानसिकतेचा फायदा घेत भोंदू लोक समाजमाध्यमांद्वारे स्वतःला तारणहार म्हणून सादर करतात. पण प्रत्यक्षात ते लोकांच्या अडचणी वाढवतात, त्यांच्या आर्थिक शोषणाला कारणीभूत ठरतात. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर अंधश्रद्धा विरोधी कायदे अस्तित्वात आहेत, तसेच फसवणुकीविरुद्धही कठोर तरतुदी आहेत. मात्र, समाजमाध्यमांवरील या प्रकारांवर नियंत्रण ठेवणे अधिक कठीण ठरते. कारण ही माध्यमे अत्यंत गतिमान असून, अनेकदा बनावट खात्यांमधून किंवा परदेशातूनही अशा प्रकारचे संदेश प्रसारित केले जातात. त्यामुळे केवळ कायद्याने या समस्येवर नियंत्रण मिळवणे शक्य नाही. यासाठी समाजाची सजगता आणि जागरूकता अत्यावश्यक आहे. माध्यमांची जबाबदारी येथे अधिक महत्त्वाची ठरते. पारंपरिक माध्यमांनी अशा प्रकारांचा पर्दाफाश करून लोकांमध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर समाजमाध्यमांचा वापर करणाऱ्या प्रत्येकानेही माहितीची पडताळणी करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. कोणतीही गोष्ट अंधपणे स्वीकारण्याऐवजी तिच्या सत्यतेचा शोध घेणे हीच खरी जागरूकता ठरते. शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित करणे आवश्यक आहे. केवळ माहिती मिळवणे पुरेसे नाही, तर त्या माहितीचा विचारपूर्वक वापर करणे ही काळाची गरज आहे. संत परंपरेने आणि सामाजिक सुधारकांनी दिलेला विवेकाचा संदेश आज अधिकच महत्त्वाचा ठरतो. अखेर, समाजमाध्यमे ही साधने आहेत, साध्य नाहीत. त्यांचा योग्य वापर केल्यास समाजाच्या प्रगतीसाठी ते उपयुक्त ठरू शकतात, पण त्याच माध्यमांचा गैरवापर केल्यास ते अंधश्रद्धा आणि फसवणुकीचे प्रभावी शस्त्र बनू शकतात. म्हणूनच प्रत्येकाने जागरूक राहून विवेकबुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे.

# जिजामाता स्कूलचा ‘एक दिवस गणितासाठी’ उपक्रम यशस्वी; गणिताची भीती दूर करण्याचा प्रयत्न

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताविषयीची भीती दूर करून त्यांच्यात गणिताविषयी आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलने इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘एक दिवस गणितासाठी’ हा अभिनव उपक्रम मोठ्या उत्साहात राबवला. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून संपूर्ण शाळा परिसर गणितमय वातावरणाने भारावून गेला होता.



या विशेष दिवशी पारंपरिक अध्यापन पद्धतीऐवजी विविध खेळ, कोडी, स्पर्धा आणि कृतींमधून गणित शिकवण्यात आले. विद्यार्थ्यांना गणितातील संकल्पना समजण्यासाठी ‘गणितीय खेळ’, ‘पझल्स’, तर्कशक्ती वाढवणारे उपक्रम आणि गणितावर आधारित प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेत गणितातील अवघड वाटणाऱ्या संकल्पनाही सहज आत्मसात केल्या.

कार्यक्रमादरम्यान ‘गणित रांगोळी’, ‘गणितीय मॉडेल प्रदर्शन’, तसेच ‘जलद गणित स्पर्धा’ यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गणित हा विषय कठीण नसून योग्य पद्धतीने शिकवल्यास तो अतिशय रंजक ठरू शकतो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गणिताबद्दल आत्मविश्वास वाढला आहे.

शिक्षकांनीही या उपक्रमासाठी विशेष तयारी करून विद्यार्थ्यांना सोप्या व खेळकर पद्धतीने मार्गदर्शन केले. यासाठी शाळा व्यवस्थापन, प्राचार्या जिज्ञासा कुलकर्णी, उपप्राचार्या माधुरी शेवाळे, गणित विषय शिक्षिका दिपाली फटांगरे, आरती शिरसाठ, जया भोकनळ, पल्लवी थोरात, क्रीडाशिक्षिका गीता शेवाळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. एकूणच, ‘एक दिवस गणितासाठी’ हा उपक्रम विद्यार्थ्यांना गणिताशी मैत्री करण्यास प्रवृत्त करण्यात यशस्वी ठरला असून भविष्यातही असे उपक्रम राबवण्याचा मानस शाळेने व्यक्त केला आहे.

# डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे कृतीतून आचरण काळाची गरज - विवेक कोल्हे

कोपरगाव (युवावार्ता प्रतिनिधी)-



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा मूलमंत्र आजही तितकाच प्रेरणादायी आहे. त्यांनी भारतीयांना सर्वधर्मसमभावाचा अधिकार दिल्यामुळे देशात शांतता, सलोखा आणि प्रगतीचा मार्ग कायम राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे कृतीतून आचरण करणे आवश्यक आहे, ती काळाची गरज आहे, असे प्रतिपादन युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी केले आहे.

कोपरगाव शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या प्रसंगी सर्व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कोपरगाव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय नूतन इमारतीत कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने १० तासांचे स्टडी मॅरेथॉन सत्र आणि भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन युवानेते विवेकभैय्या कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान आणि शिक्षण सभापती संजनाताई संजय उदावंत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी जि. प. प्राथमिक शाळा, मुर्शतपूर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका पुष्पाताई काळे यांच्या शुभहस्ते भारतीय संविधान हस्तलिखित प्रत लेखन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शनामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी संवाद साधत सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गट नेते प्रसाद आढाव, डी. आर. काले, दिलीप दारूणकर, रवींद्रअण्णा पाठक, राजेंद्र सोनवणे, संजय उदावंत, अमोल अजमेरे, संतोष शिंदे, दत्तात्रय पगारे, विक्रमादित्य सातभाई, योगेश बागुल, फिरोज पठाण, स्वप्नील मंजुळ, संदीप देवकर, अतुलशेठ काले, विनोद राक्षे, रवींद्र कथले, वैभव गिरमे, अविनाश पाठक, मयूर गायकवाड, सोमनाथ म्हस्के, दीपक जपे, राहुल खरात, गोपीनाथ गायकवाड, रवींद्र रोहमारे, सतीश रानोडे, प्रदीप नवले, सलीम पठाण, जयप्रकाश आव्हाड, संतोष गंगवाल, सुशांत खैरे, नसिरभाई सय्यद, फकीर मोहम्मद पहिलवान, कलविंदरसिंग डडीयाल, निसार शेख, मुकुंद उदावंत, शामभाऊ अहेर, सुनील कुंढारे, संतोष साबळे, सिद्धार्थ सोनवणे, रोहित कनगरे, बाळासाहेब सोनटक्के, खालिक कुरेशी, इरफान कुरेशी, योगेश नरोडे, राजेंद्र गायकवाड, धनंजय आढाव, संतोष शेजवळ, नाना भुजबळ, राकेशजी काले, आशिष निकुंभ, संतोष चवंडके, प्रतीक पगारे, अभिषेक मंजुळ, प्रभूदास पाखरे, संदीप वाकचौरे, प्रतीक पाठक, महेश दुशिंग, जितेंद्र दिवेकर, संपत चंदनशिव, बाळासाहेब पवार, रिंकेश नरोडे, ज्ञानेश्वर गोसावी, कैलास खैरे, सोमनाथ रोठे, निखील सांगळे, फकीरा चंदनशिव, शैलेश नागरे आदींसह कोपरगाव शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**श्री साई मेस**
आमच्याकडे शुद्ध शाकाहारी घरगुती मेस आहे
शुद्ध शाकाहारी जेवण तयार करुन मिळेल संगमनेर
8530530656

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**गाळा विकणे आहे**
२४५ स्क्वे.फुट आर.सी.सी. बांधकाम असलेला चैतन्यनगर येथील गाळा विकणे आहे
9405261738
9822315031

**पाहिजेत**
अनुभवी स्त्री/ पुरुष सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता – मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**रॅक विकणे आहे**
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर...
आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
**साई मंगल लॉन्स**
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता– समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क– प्रताप गोडगे
9890924380

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

READ E- NEWS ON
Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत ‘दैनिक युवावार्ता व्यवस्थापन’ हमी देऊ शकत नाही, याची नोंद घ्यावी

CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची




卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# राहुरी विधानसभा मतदारसंघामध्ये मनाई आदेश जारी

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-

राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी दि. २३ एप्रिल रोजी मतदान तर ४ मे २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ व ३३ (१) (ओ) नुसार मतदारसंघात कोणत्याही व्यक्तीस गैरकृत्य करण्यास दि. ४ मे २०२६ पर्यंत मनाई करणारे आदेश जारी केले आहेत.



आदेशानुसार मतदारसंघामध्ये कोणत्याही व्यक्तीस रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही मिरवणुका, रॅली, सभा ठरविलेल्या मार्गाव्यतिरिक्त नेण्यास तसेच दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त आणि वेळेव्यतिरिक्त इतर मार्गाने नेण्यास व वेळेचे उल्लंघन करण्यास मनाई आहे. सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी आणि प्रार्थनास्थळांच्या आसपास प्रार्थनेच्या वेळी कोणत्याही रस्त्यावरील किंवा सार्वजनिक जागी लोकांनी एकत्र जमण्याच्या ठिकाणी गर्दी करण्यास किंवा अडथळा निर्माण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

सर्व रस्त्यांवर, रस्त्यामध्ये, घाटात, घाटावर, सर्व धक्क्यांवर किंवा धक्क्यामध्ये, जत्रा, देवालय, मशीद, दर्गा आणि सार्वजनिक लोकांच्या जाण्या-येण्याच्या जागांमध्ये गोंधळ घालण्यास, बेशिस्तपणे वागण्यास मनाई आहे. कोणत्याही रस्त्यात, रस्त्याजवळ किंवा अनियमित व विनापरवाना सार्वजनिक जागी वाद्ये वाजवण्यास, गाणी म्हणण्यास, ढोल-ताशे वाजवण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ, कोणत्याही उपाहारगृहात ध्वनिक्षेपकाचा विनापरवाना वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

याबाबत कोणास सवलत अगर परवानगीची आवश्यकता असल्यास २२३-राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यात आले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# जिल्हा रूग्णालयातील बनावट दिव्यांग प्रमाणपत्र रॅकेट उघड; दोघांना अटक

अहिल्यानगर
(युवावार्ता प्रतिनिधी)-




जिल्हा रूग्णालयातून बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे काढून देण्याच्या आरोपावरून एजंटगिरी करणार्या दोघांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. दिलीप राजेंद्र आंधळे (रा. गिरीवाडी, ता. पाथर्डी) व जालिंदर ऊर्फ प्रेमकुमार अरूण वारे (रा. भुतकरवाडी, बालिकाश्रम रस्ता, अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची (१७ एप्रिलपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, या प्रकरणात १५ संशयितांचा सहभाग निष्पन्न झाला असून, त्यापैकी आतापर्यंत नऊ जणांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. जिल्हा रूग्णालयातील काही कर्मचार्यांच्या संगनमताने कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता, तसेच रूग्णालयात नोंद न करता थेट ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरून बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे तयार करण्यात येत असल्याचे चौकशीत उघड झाले आहे. या गैरप्रकाराचा फायदा घेत अनेकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचेही समोर आले आहे. दिव्यांग प्रमाणपत्र प्रणालीचा आयडी आणि पासवर्ड चोरून किंवा गैरवापर करून ही प्रमाणपत्रे तयार करण्यात आली असल्याचा आरोप आहे.

प्रारंभी या प्रकरणाचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याकडे होता. त्यांनी सुरूवातीला तिघांना अटक केली होती. त्यानंतर तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेने आतापर्यंत तीन नोकरदारांसह चौघांना अटक केली होती. आता या प्रकरणात एजंट म्हणून काम करणार्या आणखी दोघांना अटक करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, अटक संशयित आरोपींकडून अधिक माहिती मिळविण्याचे काम सुरू आहे.

# जलव्यवस्थापन पंधरवडा प्रभावी राबवा - आ. खताळ

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

जलव्यवस्थापन पंधरवडा यशस्वी करण्याची जबाबदारी अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबतच शेतकरी आणि कार्यकर्त्यांचीही आहे. मात्र हा पंधरवडा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. गोदावरी, मराठवाडा व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या वतीने संगमनेर महाविद्यालयातील बाफना हॉल येथे आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६'चा शुभारंभ आमदार खताळ यांच्या हस्ते झाला. यावेळी जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता उत्तम निर्मळ, कार्यकारी अभियंता अमोल कवडे, प्रीतम शेवाळे, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत गोमासे, शहराध्यक्ष पायल ताजने तसेच अभियंता सेलचे अध्यक्ष हरिभाऊ चकोर आदी उपस्थित होते.



**निळवंडे धरणाला ५२ वर्षे का?**
**- आ. खताळांचा सवाल**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली विभागाचे काम चांगल्या पद्धतीने सुरू आहे. समन्यायी पाणी वाटपाच्या नावाखाली संगमनेरच्या हक्काच्या पाण्यावर अन्याय झाला. निळवंडे धरणाच्या कामास झालेल्या विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, मध्य प्रदेशातील मोहनपुरा धरण १० वर्षांत पूर्ण होते, मात्र निळवंडे धरणास ५२ वर्षे का लागली? असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रकल्प वेळेत पूर्ण झाला असता, तर शेतकरी सुखी व समाधानी झाला असता.**

**- अमोल खताळ (आमदार)**

आमदार खताळ म्हणाले की, सह्याद्री घाटमाथ्यावरून समुद्राला वाहून जाणारे पाणी नदीजोड प्रकल्पाद्वारे गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे स्वप्न माजी खासदार स्व. बाळासाहेब विखे पाटील यांचे होते. या प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दिला असून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे स्वप्न पूर्ण करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी कार्यकारी अभियंता अमोल कवडे यांनी प्रस्ताविकातून जलव्यवस्थापन पंधरवडा राबविण्यामागील उद्देश स्पष्ट केला, तर आभार प्रदर्शन महेश गायकवाड यांनी केले.

पाणी जपा, नियोजन करा - उत्तम निर्मळ

पाणी हेच जीवन मानून त्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी नियमानुसार अर्ज करून पाणी घ्यावे. जलसंपदा विभागाने संपूर्ण हंगामाचे नियोजन करावे. पाणी वापर संस्थांची स्थापना करून शेतकऱ्यांनी मालकी हक्क प्रस्थापित करावा. पावसातील खंड लक्षात घेऊन पिकांची निवड करावी. वाढत्या तापमानावर संशोधन होणे गरजेचे आहे. पश्चिमेकडील समुद्राला वाहून जाणारे पाणी भंडारदरा, मुळा किंवा दारणा धरणात वळविण्याचा संकल्प पूर्ण झाल्यास मोठा फायदा होईल.

- उत्तम निर्मळ (सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, जलसंपदा)

# माजी मंत्री थोरातांनी केले भास्करगिरी महाराजांचे सांत्वन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -



नेवासा तालुक्यातील देवगड संस्थांचे पिठाधीश महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या मातोश्रींचे नुकतेच निधन झाले असून काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी देवगड येथे जाऊन भास्करगिरी महाराज यांचे सांत्वन केले. देवगड येथे महंत भास्करगिरी महाराज यांची माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी समवेत अहिल्यानगर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

मातोश्री सरूबाई पेसोडे यांचे नुकतेच निधन झाले असून महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांना मातृशोक झाला आहे. देवगड देवस्थान हे उत्तर महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण व भाविकांचे मोठे श्रद्धास्थान असलेले क्षेत्र आहे. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी संत परंपरेचा समृद्ध वारसा जोपासत सामाजिक सलोखा निर्माण करून मठाला मोठे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. देवगड देवस्थान सर्वांचे मोठे श्रद्धास्थान आहे. महाराजांच्या दुःखामध्ये आपण सहभागी असल्याचे ते म्हणाले.

लोकनेते बाळासाहेब थोरात हे वारकरी संप्रदायाचे पाईक असून त्यांनी कायम संत महात्मे यांचा आदर केला आहे. यावेळी नेवासे येथील विविध कार्यकर्ते व धार्मिक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दैनिक युवावार्ता कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाजसुधारक आणि महान विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दैनिक युवावार्ता कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या विचारांचे आजच्या काळात असलेले महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संस्थापक किसन भाऊ हासे यांनी सांगितले की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, संघर्ष आणि जिद्दीच्या जोरावर संपूर्ण जगासमोर एक आदर्श निर्माण केला. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर लढा दिला आणि समानतेच्या तत्वांवर आधारित समाजव्यवस्था उभी करण्यासाठी प्रयत्न केले.

आपल्या मार्गदर्शनात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांसारख्या महापुरुषांच्या विचारांचा उल्लेख करत सांगितले की, या सर्वांनी समाज परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब प्रत्येकाने आपल्या जीवनात करणे आवश्यक आहे. समाजात समानता, न्याय आणि बंधुता निर्माण करण्यासाठी या महान व्यक्तींच्या शिकवणीचा उपयोग होऊ शकतो.

किसन भाऊ हासे यांनी पुढे सांगितले की, आजच्या पिढीला या महापुरुषांचा संघर्ष आणि त्याग पूर्णपणे समजणे कठीण झाले आहे. त्यामुळे अशा जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचा अभ्यास करणे आणि त्यातून प्रेरणा घेणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या जागतिक आणि युद्धजन्य परिस्थितीत भारत स्थिर आणि सक्षम आहे, याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या महापुरुषांनी दिलेली मूल्ये, विचार आणि त्याग होय. तसेच त्यांनी समाजातील वाढत्या मतभेदांवरही भाष्य केले. प्रत्येक समाजाने महापुरुषांना आपापसांत विभागून घेतल्यामुळे समाजात फूट निर्माण होत आहे. प्रत्यक्षात हे सर्व महापुरुष संपूर्ण देशाचे आहेत आणि त्यांच्या विचारांचा लाभ सर्व समाजाने एकत्रितपणे घ्यायला हवा, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने सर्व उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी कार्यकारी संपादक सुदीप किसन हासे तसेच कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

**युवा न्यूज डिजिटल वाचक प्रतिसाद**

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**युवा न्यूज डिजिटल क्षेत्रात कार्यरत असताना अनेक व्हिडिओंना एक लाखाच्या पुढून व्यूज मिळालेले आहेत. अत्यंत गंभीर घटनांच्या संदर्भातील व्हिडिओंना वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असताना दैनिक युवावार्ताद्वारे डिजिटल युवा प्रतिसाद माहिती वाचकांना देत आहोत. वाचकांनी आपले अभिप्राय कळविण्याची विनंती.**

**शहरातील चावडी येथील तलाठी कार्यालयात शासकीय कामकाजात गंभीर अनियमितता उघडकीस आली असून, दिव्यांग व वयोवृद्ध नागरिकांकडून पैसे उकळले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. मात्र, संबंधित महिलेने आमदार अमोल खताळ यांना मोबाईलवर मेसेज केल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष तेथे जाऊन 'एजंटगिरी'चा पर्दाफाश करत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारवाईच्या सूचना दिल्या.त्यासंदर्भातील व्हिडिओ वाचकांच्या माहितीसाठी युवा न्यूज द्वारे QR कोड देत आहोत.**

# स्वानुभव नमामि देवी नर्मदे... | भाग - २

आपण सोबत खाण्याचे काहीही सामान न घेताही ही परिक्रमा पूर्ण करू शकतो, हे लक्षात आले. रस्त्याने ताक, लस्सी प्यायला मिळत गेले. एकादशी असल्यामुळे वेफर्स, चिवडा असे उपवासाचे पदार्थ होते....क्रमशः...

एक २०/२२ वर्षाचा मुलगा आम्हाला परिक्रमे दरम्यान मंदिरात परत परत भेटत होता. साधारणपणे ५ फूट उंचीचा, पांढरा कुडता पायजमा घातलेला, कपाळाला गंध. दोन-तीन वेळा दिसल्यावर न राहवून मीच हिंदीत विचारलं, भैय्या कहाँ से हो, तो म्हणाला, कल्याण. मला तर खूप आनंद झाला. आपणही महाराष्ट्रातूनच आलो आहोत. मग मी मराठीत बोलायला सुरुवात केली. तो एक इंजिनिअर होता. प्रत्येक मंदिरात तो डोळे मिटून, तल्लीन होऊन परमेश्वराशी एकरूप होऊन शंकराचे भजन गात होता. तेही शास्त्रीय संगीत. कान तृप्त होत होते. जणू सूरदासच भगवंतासाठी गातोय की काय, असं वाटावं. तो एक कृष्णभक्त आणि हा शिवभक्त, इतकाच काय तो फरक. त्याचा भाव आणि भक्ती पाहून आम्ही त्या भक्तिरसात न्हाऊन निघालो. पुढे दोन-तीन ठिकाणी पुन्हा भेट झाली. स्मितहास्य करत आम्ही एकमेकांना निरोप दिला. पुढे परिक्रमेत मुंबईचे अनेक लोकं आम्हाला भेटली.

गरुडेश्वर मंदिरात टेंभे स्वामींची समाधी आहे. टेंभे स्वामींचे दुसरे नाव म्हणजे वासुदेवानंद सरस्वती. त्यांनी हे गरुडेश्वर मंदिर बांधले आहे. प्रत्येक मंदिरात ज्या साधकाने मंदिर बांधले आहे, त्याचा उल्लेख दिसून येतो. गरुडेश्वर येथे टेंभे स्वामींच्या पादुका आहेत. मी आतापर्यंत तीन वेळा जाऊन आले आहे. यावेळी मात्र खूपच गर्दी वाटत होती. ती परिक्रमेमुळे असेल. परंतु आपण इतर वेळी गेलो, तर तेथे शांत, प्रसन्न असं वातावरण असतं. इथे साधनेसाठी एकदम पोषक असं वातावरण असतं. आश्रम, बाजूने वाहणारा नर्मदामाईचा प्रवाह आणि सुंदर अशी दत्ताची मूर्ती, साधकाला अजून काय हवं! दत्त महाराजांचे शिष्य येथे साधनेसाठी येऊन राहतात. त्यात परदेशी पर्यटक देखील मोठ्या संख्येने असतात. आम्ही दर्शन घेऊन प्रसन्न अंतःकरणाने हॉटेलमध्ये पोहोचलो.



तिलकवाड्याच्या शंकर महाराज मठापासून परिक्रमेला सुरुवात केली. परिक्रमेला सुरुवात केल्यावर चार-पाच किलोमीटरवर पहिल्यांदा लागते ते मणी नागेश्वर मंदिर, नंतर कपिलेश्वराचे मंदिर. येथे दर्शन घेऊन चहा घेतला. फ्रेश झालो. पुढे वासुदेव आश्रम लागला. नर्मदेच्या किनाऱ्याला चालत राहिलो. इथले प्रत्येक मंदिर हे कोणत्या ना कोणत्या साधकानेच बांधलेले आहे. काही अंतर चालून गेल्यावर नंदी घाट लागला. तेथे एक मोठा नंदी आहे आणि बाजूला अनेक शिवलिंग एकरांगेत आहेत. साधारण १०८ असावेत. फायबरचे मोठे शिवलिंग देखील आहेत. इथे बरेच जण थांबून विश्रांती घेतात, थोडं फोटो सेशन करतात. इथून बोटीने नदीच्या दुसऱ्या किनाऱ्याला जावे लागते. त्या किनाऱ्याला रामपूरा घाट आहे. रामपुराला परिक्रमा पोहोचते. काही लोकं इथून परिक्रमा चालू करतात. तिथे रणछोडरायचे मंदिर, महादेव मंदिर, अंबाजी मंदिर आहे. इथे थकलेल्या परिक्रमावासियांसाठी मसाजची व्यवस्था असते. काही फूट मसाज करून घेतात. काही इलेक्ट्रिक मसाज घेतात. आराम करतात आणि पुढचा प्रवास चालू करतात. या मंदिराच्या बाहेर एक सुंदर बीन वाजवणारा भेटला. हे वाद्य वाजवत तो नर्मदामाईचे गुणगान करत होता. आपल्याकडे ही कला लुप्त होत चालली आहे. घरी नाती आहेत, त्यांना दाखवण्यासाठी त्याचं थोडं शूटिंग घेतलं. तो आनंद मनात साठवून पुढे निघालो. चालत चालत पुढे आलो, धनेश्वर महादेव मंदिरात पोहोचलो. या मंदिराला लागूनच आश्रम होता. या आश्रमाचे महंत सर्वांना प्रसादासाठी आग्रह करत होते. नर्मदे हर बोलता जाओ, प्रसाद लेवता जाओ, हे वाक्य ते महंत परत परत म्हणत होते. पुढे मंगरुळु गाव होतं. तिथे मंगलेश्वराचे मंदिर होते. अनेक मंदिरात तांब्याच्या लोट्यात पाणी असायचे. पाणी नसेल, तर नळाची सोय होती. पाणी भरायचं आणि महादेवाला पाणी घालायचं. आमच्याकडे पूजेचं कोणतंच साहित्य नसल्यामुळे दोन हात तिसरं मस्तक असा आमचा पवित्रा होता.

पुढे गेल्यावर तपोवन आश्रम होता. इथे साईबाबांचे मंदिर होते. कमळाचे मोठे तळे होते. भरपूर कमळे उमलून आनंदाने डोलत होती, जणू त्यांचं भाग्य नर्मदा किनारी फळलं होतं. गोकर्णाचे डबल गुच्छ असलेल्या फुलांची वेल होती. आपल्या भागात अशी गोकर्ण आम्ही कधी पाहिली नाही. म्हणून आम्ही त्याच्या शेंगा शोधत होतो, पण मिळाल्या नाही. थोडं पुढे जाऊन बऱ्याच पायऱ्या उतरून आम्ही खाली गेलो. तिथे अगदीच दोन-तीन माणसे आंघोळ करत होती. चार-पाच मुलं सराईतपणे पोहत होती, मस्ती करत होती. आम्ही तिथेच पाण्यात उतरलो. नर्मदेत आंघोळी केल्या. मनात भीती वाटत होती, कारण बाहेर बोर्डवर लिहिल होतं, मगरीपासून सावधान. काहीसं भीतभीतच मी आंघोळ केली. काहीसा थकवा कमी झाला, असं वाटत होतं. पण पायऱ्या जास्त आणि उंचीही जास्त, त्यामुळे चढताना गुडघ्यात चमका निघू लागल्या. ऊन वाढत होतं. पायऱ्या चढेपर्यंत कपडे बऱ्यापैकी सुकले होते. त्यामुळे बदलायच्या भानगडीत न पडता तसेच राहू दिले. याच आश्रमात उपवासाचा चिवडा खाऊन ताक प्यालो. थोडा आराम केला. पुढे चालू लागलो.

पुढच्या टप्प्यात मारुती मंदिर लागलं. इथे लस्सी होती, पण आमच्या पोटात जागा नसल्यामुळे दर्शन करून पुढे निघालो. गोपारेश्वर महादेवाचे मंदिर लागले. तिथे एक स्वयंभू अशी पिंड होती. एक पिवळसर दगड, एखाद्या पाट्यासारखा (वारवंट्यासोबत असतो तसा पाटा), असे ते शिवलिंग होते. एक वेगळीच पिंड वाटली. तिथे एक साधक अनवाणी चालत नैवेद्य घेऊन आला होता. पुढे रामानंद आश्रम होता. त्यानंतर सीताराम आश्रम लागला. इथे एक देवीचे मंदिर होते. दुपारची वेळ होती. तेथे भंडारा चालू होता. इथे बरेच गुजराती लोकं भेटली. पुढे गुजरात सरकारने मोठाले मंडप उभारले आहेत. तेथे थोड्या-थोड्या अंतरावर विश्रांतीसाठी बाज टाकल्या आहेत. थकलेले परिक्रमावासी येथे थोडा आराम करतात.

प्रत्येक वर्षी चैत्र महिना चालू झाला की नर्मदा उत्तरवाहिनी परिक्रमा चालू होते. ही परिक्रमा महिनाभर चालू असते. गुजरात सरकार या कालावधीत नर्मदा नदीवर एक तात्पुरता पूल उभारतात. हा पूल ओलांडून आल्यावर परिक्रमा पूर्ण होते. हा पूल चैत्र महिना संपल्यावर काढून टाकण्यात येतो. पूर्वीसारखा पाण्याचा प्रवाह चालू होतो...

(क्रमशः पुढील भागात)

**सौ. मंगल किशोर पेटकर,**
**संगमनेर**
**मो. ७५८८६९३५०२**

पॅनल
देणे आहे

दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पॅनल
देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर....................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# भोजदरीतील वृक्षारोपणात भ्रष्टाचाराचा आरोप

## कागदोपत्री हजारो झाडे, प्रत्यक्षात शून्य; गावकऱ्यांचा संताप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पठार भागातील भोजदरी गावात सामाजिक वन विभागामार्फत करण्यात आलेल्या वृक्षारोपणात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

कागदोपत्री सात हजार पाचशे झाडे दाखवून प्रत्यक्षात मात्र झाडेच न लावता बिले काढण्यात आल्याचा आरोप करत चौकशीची मागणी केली जात आहे. सन २०२३ ते २०२६ या कालावधीत तब्बल ७५०० वृक्षांची लागवड केल्याचे नोंदीत दाखवण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्ष पाहणी केली असता गाव परिसरात अत्यल्प झाडे दिसून येत असून, लावण्यात आलेली झाडेही जिवंत नसल्याचा दावा डॉ. योगेश मते यांनी केला आहे. त्यामुळे कागदोपत्री हरितीकरण आणि प्रत्यक्षात उजाड माळ, अशी स्थिती निर्माण झाली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ही कामे मनरेगा अंतर्गत झाल्याचे सांगितले जात असले, तरी ज्या ग्रामस्थांच्या नावावर मजुरीची बिले काढण्यात आली, त्यांनाच याबाबत कोणतीही सविस्तर माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

काही ठरावीक व्यक्तींच्या नावावर बनावट बिले तयार करण्यात आली असून, मृत व्यक्तींच्या नावावरही पैसे काढल्याचा धक्कादायक प्रकार झाल्याचे भास्कर भारती यांनी सांगितले. या सर्व प्रकारातून शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचा आरोप केला जातोय यामुळे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशालाही तडा गेल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

या प्रकरणाची माहिती उघड करणाऱ्या काही तरुणांना धमक्या दिल्या जात असल्याचेही समोर आले असून त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी प्राध्यापक भाऊसाहेब घोडके, ज्ञानदेव मते, पोपट वाळूज, आदींनी केली आहे. या प्रकरणाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही लक्ष वेधले गेले असून प्राथमिक स्तरावर चौकशी सुरू करण्याचे संकेत मिळत आहेत. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असे आश्वासन प्रशासनाकडून दिले जात असल्याने ग्रामस्थांचे लक्ष चौकशीच्या निष्कर्षाकडे लागले आहे.

# चुलत्याकडून...

पान १ वरून -

पोलीस उपनिरीक्षक फराहनाज पटेल यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचे लोकेशन शोधून अकोले येथून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. १४ एप्रिलच्या मध्यरात्री त्याला अधिकृत अटक करण्यात आली. बुधवारी आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता, सहाय्यक सरकारी वकील मच्छिंद्र गवते यांनी गुन्ह्याचे गांभीर्य अधोरेखित करत सखोल तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायाधीश मंदार नेरलेकर यांनी प्रकरणाचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन आरोपी संतोष राऊत याला १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणात वापरलेला चाकू जप्त करणे, पीडित बालिकेच्या अंगावरील कपडे ताब्यात घेणे तसेच आरोपीची वैद्यकीय तपासणी करणे अद्याप बाकी असून तपास सुरू आहे. या अमानुष घटनेमुळे संगमनेर परिसरात संतापाची लाट उसळली असून, आरोपीस कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी तीव्र भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक फराहनाज पटेल करत आहेत.

# अल्पवयीन मुलीचा बालविवाह

## सासरी अत्याचार प्रकरणी सात जणांवर गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अवघ्या १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावून दिल्यानंतर सासरी तिचा शारीरिक व मानसिक छळ करून अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात पतीसह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपासासाठी हा गुन्हा संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही मूळची मुकींदपूर (नेवासा फाटा) येथील आहे. ती अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही तिच्या आई-वडिलांनी आणि एका मध्यस्थाने संगनमत करून तिचा विवाह शिंदोडी (ता. संगमनेर) येथील एका तरुणाशी लावून दिला होता. हा विवाह सन २०२४ मध्ये झाला होता. लग्नानंतर पीडिता शिंदोडी येथे सासरी राहण्यास गेल्यानंतर १० एप्रिल २०२६ पर्यंत तिच्यावर सातत्याने अन्याय झाला. सासरी राहत असताना पतीने तिच्या इच्छेविरुद्ध वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित करून अत्याचार केला. तसेच शुल्लक कारणावरून तिला मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आली. या छळामध्ये केवळ पतीच नाही तर सासरच्या इतर मंडळींचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे. पीडितेच्या सासूने तिला वारंवार उपाशी ठेवून तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला. या जाचाला कंटाळून अखेर पीडितेने धाडस करत पोलीस ठाणे गाठले आणि आपल्यावर ओढवलेला प्रसंग सांगितला. याप्रकरणी पोलिसांनी पीडितेचे आई-वडील, लग्नातील मध्यस्थ, तसेच शिंदोडी येथील सासू, सासरे, दीर आणि पती अशा एकूण सात जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

सदर घटनेतील गुन्हा सुरुवातीला एमआयडीसी पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला होता, मात्र घटनास्थळ संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने आता या प्रकरणाचा सखोल तपास घारगाव पोलीस करत आहेत. बालविवाह आणि अत्याचार अशा दोन्ही गंभीर कलमान्वये हा गुन्हा दाखल करण्यात आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# भोंदू अशोक खरात प्रकरणात नवा खुलासा

## जमीन खरेदीसाठी चक्क नॅशनलाईज बँकेचा वापर

नशिक (वृत्तसंस्था)

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला चौथ्या गुन्ह्याप्रकरणी अठरा एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. तर भोंदु अशोक खरातच्या डखढ चौकशीत अद्याप महत्त्वाच्या मुद्द्यांवर तपास सुरू आहे. अशातच आता भोंदूगिरी आणि फसवणुकीच्या प्रकरणात अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणी नवी अपडेट समोर आली आहे. महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरातनं अनेक व्यवसायिक तसेच गृहस्थांनाही गंडवलं होतं. अलीकडेच त्याचा नॅशनलाईज बँकेसंबंधी नवा कारनामा उघड झाला आहे. यामुळे अशोक खरातचा पाय आणखी खोलात गेल्याचं दिसून येतंय. परिणामी अशोक खरातचे आर्थिक व्यवहारातील भागीदार आता एसआयटी च्या रडारवर आले आहे.

दरम्यान, नाशिकसह अहिल्यानगर जिल्ह्यातील विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांची एसआयटीकडून आता चौकशी केली जाणार आहे. अशोक खरातच्या आर्थिक व्यवहारात मोठ-मोठे बांधकाम व्यावसायिक सहभागी असल्याचा तपास यंत्रणेला संशय आहे. यात भोंदू खरात भक्तांकडून श्रद्धेच्या नावावर लाखो रुपये उकळवत असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली असून त्या दिशेने तपास सुरु आहे. दरम्यान, भक्तांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत भोंदू खरातने अनेक ठिकाणी जमीन खरेदी केल्या आहेत. यांपैकी काही एकर जमीन त्याने शिर्डी येथे देखील खरेदी केल्याची माहिती आहे. त्याची ही सगळी जमीन एकूण ११ ते १२ एकर असल्याचं समोर आलं होतं. अलीकडेच त्याने खरेदी केलेल्या ४ एकर जमीनीसाठी नॅशनलाईज बँक खात्याचा वापर करण्यात आला असल्याचा आरोप आहे. या नॅशनलाईज बँकेतील खाती कल्पना खरातच्या नवावर आहेत. संबंधित खात्यायंमधून १७ कोटींचे व्यवहार झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13






कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25